गुरुवार, 15 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 45
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THRUSDAY 15 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-45 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-6 ● PRICE-5


# 'एकला चलो रे'चा 'मनसे' नारा

## आमच्या पक्षाचे निर्णय राज ठाकरे घेतात, भाजपा नाही : सरचिटणीस संदीप देशपांडे यांनी केले सूचक विधान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : आगामी महापालिका निवडणुकांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि भाजपा एकत्र येणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगली आहे. भाजपा नेते राज ठाकरेंची भेट घेत असल्याने ही वाढती जवळीक पाहता लवकरच याबाबत अधिकृत घोषणा होईल अशी शक्यता व्यक्त होती होती. पण यादरम्यान, मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांनी सूचक विधान केलं आहे. राज ठाकरे यांनी सर्व पालिकांच्या निवडणूक लढवण्यासाठी तयारीला लागण्याचे आदेश दिल्याची माहिती संदीप देशपांडे यांनी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली आहे.**

संदीप देशपांडे यांना मनसेच्या बैठकीसंबंधी विचारण्यात आलं. बैठकीत झालेल्या चर्चेनंतर शिंदे गटासोबत युती करणार का? असं विचारण्यात आलं असता ते म्हणाले "ही पक्षाची अंतर्गत विषयासंबंधी बैठक होती. तिथे काय चर्चा झाली हे माध्यमांसमोर सांगू शकत नाही. शिंदे गटासोबत युती करण्यासंबंधीच्या बातम्या आम्हीही पाहत आहोत. पण राज ठाकरेंच्या आदेशानुसार मुंबई, नवी मुंबई, संभाजीनगर किंवा इतर महापालिकांच्या ठिकाणी सर्व पदाधिकारी सर्व जागा लढवण्याची तयारी करत आहेत".

शिंदे गट किंवा भाजपासोबत युती करण्यासंबंधी विचारलं असता संदीप देशपांडेनी सध्या राज ठाकरेंनी सर्व जागा लढवण्यासाठी तयारी करण्याचे आदेश दिले असल्याचा पुनरुच्चार केला. "आमच्या पक्षाचे निर्णय राज ठाकरे घेतात, भाजपा घेत नाही. राज ठाकरेंनी दिलेल्या आदेशानुसार सर्व जागा लढवण्याची तयारी सर्व पदाधिकारी, शाखा अध्यक्ष करत आहेत," असं त्यांनी सांगितलं.

पुढे ते म्हणाले "याआधीही २०० ते २२७ दरम्यान जागा लढवल्या होत्या. २००६, २०१२, २०१७ मध्ये आम्ही सर्व ताकदीने सर्व जागा लढवल्या होत्या. त्याचप्रमाणे यावेळीही २२७ जागा लढवण्याच्या दृष्टीने तयारी करत आहोत. तशी तयारी सुरु असून राज ठाकरेंकडून वेळोवेळी आदेश येत आहेत".

भाजपाचा मनसेशी उघड युती न करता छुपे सहकार्य करण्याचा निर्णय

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपाने मनसेशी उघड युती न करता छुपे सहकार्य करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे. त्यानुसार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटासाठी ८०-९० जागा सोडण्याचा भाजपचा प्रस्ताव असून, त्यांनी मनसेशी युती करून त्यांना आपल्या वाटयातील जागा द्याव्यात, असा भाजपाचा विचार आहे. न्यायालयीन लढाईत चित्र स्पष्ट झाल्यानंतर योग्य वेळी याबाबत




अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजतं. भाजपा नेते आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याबरोबर गाठीभेटी वाढल्या आहेत. मात्र, मनसेशी थेट युती करण्याची भाजपाची तयारी नाही. शिवसेना आणि मनसे एकत्र येऊ नये आणि शिवसेनेची मराठी मतपेढी फोडण्यासाठी मनसेचा वापर करावा, अशी भाजपची रणनीती आहे.

भाजपाने शिंदे गटाबरोबर युती करून निवडणूक लढविण्याचे जाहीर केलं आहे. शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्ह मिळते का आणि शिवसेनेतील किती नगरसेवक शिंदे गटाकडे येणार, यावर किती जागा सोडायच्या, याविषयी निर्णय होईल. मनसेशी वेगळी युती करून त्यांना जागा सोडणे भाजपाला शक्य नसल्याने छुप्या सहकार्याची रणनीती आखण्यात आली आहे. त्यामुळे शिंदे गटाशी युती म्हणून त्यांना ८०-९० जागा सोडायच्या आणि प्रभागांमधील ताकदीनुसार शिंदे गटाने त्यामधून मनसेच्या उमेदवारांसाठी जागा सोडायच्या, असे तूर्त ठरविण्यात आलं आहे. मनसेकडे अनेक जागांवर चांगले उमेदवार नसले तरी शिवसेनेच्या मराठी मतांचे विभाजन करण्यासाठी भाजपा त्यांचा वापर करण्याचे संकेत आहेत. मनसे जिथे निवडून येऊ शकते, त्या जागांवर भाजपा उमेदवार देणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना दिल्याचे समजतं.

# गोव्यात काँग्रेसला मोठा धक्का, आठ आमदार जाणार भाजपात?



आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** देशात काँग्रेस पक्षाला उभारी देण्यासाठी 'भारत जोडो यात्रा' अभियानाची सुरूवात झाली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली तामिळनाडू येथून या यात्रेची सुरूवात झाली. त्यात आता काँग्रेसला एक धक्का बसला आहे. गोव्यातील काँग्रेसचे ८ आमदार भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. या आठ आमदारांनी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांची भेट घेतल्याची माहिती मिळत आहे.

गोव्यात काँग्रेसचे ११ आमदार आहेत. त्यापैकी मायकल लोबो, दिगंबर कामत, दियालया लोबो, राजेश फळदेसाई, रदाल्फ फर्नांडिस, अलेक्स सिक्वेरा, केदार नाईक, संकल्प आमोणकर हे आमदार भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. गोवा भाजपाचे अध्यक्ष सदानंद तानवडे यांनी तसे संकेत दिले आहेत.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी मायकल लोबो यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर मायकल लोबो, दिगंबर कामत आणि आठ आमदार जुलै महिन्यातच भाजपात प्रवेश करणार होते. तेव्हा, काँग्रेसने कामत आणि लोबो यांच्यावर पक्षांतर बंदी कायद्याच्या अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी विधानसभा अध्यक्षांकडे केली होती. तसेच, काँग्रेसने लोबो यांची विरोधीपक्ष नेते पदावरून हकालपट्टी देखील केली.

# मुख्यमंत्री शिंदे गुजरातसमोर लाचार : राष्ट्रवादी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वेदांत फॉक्सकॉनने महाराष्ट्राऐवजी गुजरातमध्ये २०अब्ज डॉलरचा प्रकल्प उभारत असल्याचे समोर आल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे हित साधत आहेत की गुजरातचे हित साधत आहेत असा थेट सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला आहे. महाराष्ट्रातील मागील महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्र राज्यात गुंतवणुकीसाठी वेदांत फॉक्सकॉनशी योग्य संवाद व चर्चा सुरू केली होती आणि तळेगावचे ठिकाण निश्चित करण्यात आले होते.महाविकास आघाडी सरकारने स्थानिक तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने वेदांत फॉक्सकॉनला सर्वोत्तम प्राधान्य दिले होते. वेदांत फॉक्सकॉनसह व्यवसायाच्या संधीची वाट पाहणाऱ्या अनेक लहान उद्योजकांची साखळी त्यामुळे आता पूर्णपणे विस्कळीत झाली आहे असेही महेश तपासे म्हणाले. नव्याने स्थापन झालेल्या ईडी सरकारला महाराष्ट्रात वेदांत फॉक्सकॉन कायम ठेवता आले नाही ही लाजिरवाणी गोष्ट असून मुख्यमंत्री शिंदे यांची राज्याच्या विकासाबाबतची उदासीन वृत्ती दिसून येते. त्यांनी गुजरातला बळी पडून महाराष्ट्राचे आर्थिक नुकसान आणि लाखो इच्छूक तरुणांचे रोजगार बुडवले आहेत असा थेट आरोपही महेश तपासे यांनी केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रातील जनतेला आपल्या बंडाचे समर्थन करण्यात व्यस्त असून रोजगार आणि औद्योगिकीकरणासारख्या विकासाच्या मुद्द्यांवर ते बोलत नाहीत असा टोलाही महेश तपासे यांनी लगावला.

# कच्च्या तेलात पुन्हा घसरण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील महागाईचे आकडे समोर आले असून जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेत महागाई अपेक्षेपेक्षा जास्त वेगानं वाढत आहे. त्यामुळे मागणीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशातच बुधवारी आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत थोडीशी घसरण झाली. यापूर्वी मंगळवारीही कच्च्या तेलाच्या किंमतीत घट पाहायला मिळाली होती. कच्चं तेल सध्या फेब्रुवारीनंतरच्या सर्वात निचांकी पातळीवर पोहोचलं आहे. असं असलं तरी देशात मात्र गेल्या पाच महिन्यांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरांत कोणताही बदल झालेला नाही. एप्रिलपासून ऑईल मार्केटिंग कंपन्यांनी यात बदल केलेला नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल 90 डॉलरपर्यंत खाली आली आहे. परंतु ऑईल मार्केटिंग कंपन्यांचं म्हणणं आहे की, कच्च्या तेलाच्या किमती घसरल्यानंतरही त्यांना डिझेलवर तोटा सहन करावा लागत आहे. याचं कारण पेट्रोलपेक्षा डिझेलची निर्मीती करणं महाग आहे. भारत आपल्या गरजेच्या 85 टक्के तेल आयात करतो. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या अधिकृत वेबसाइट iocl.com नं जारी केलेल्या दरांनुसार, आज देशातील पेट्रोल-डिझेलच्या किमतींमध्ये कोणतीही वाढ अथवा घट केलेली नाही.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

भारताच्या उत्तरेला हिमालयाची विस्तीर्ण पर्वतराजी आहे. हिरवीगार वनराई, उंचच उंच वाढलेली सुरु, देवदार आदी वृक्षांची वने , खळाळत वाहणाऱ्या नद्या, विविध प्रकारचे प्राणी आणि पक्षी जीवन कोणाला आकर्षित करीत नाही ! पण हे खरंच तसं राहिलं आहे का, राहणार आहे का? आज तरी नक्की सांगता येत नाही. अनेक ठिकाणची वस्तुस्थिती फार भयानक आहे. आपण सहलीसाठी जातो. हरिद्वार, ऋषिकेश, बद्रीनाथ, केदारनाथ वगैरे पाहून येतो. आपण खूप समाधानी असतो. पण हिमालयातील किंवा उत्तराखंडमधील बऱ्याचशा जंगलांची प्रचंड हानी झाली आहे हे विदारक सत्य आपल्याला फारसे जाणवत नाही. चामोली, गढवाल, कुमाऊं, बढयारगड आदी परिसरातील जंगल बऱ्यापैकी नष्ट झाले आहे. पण एके काळी हा सगळा भाग भरगच्च वृक्षराजीने भरलेला होता. नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध होता. तेथे राहणाऱ्या लोकांच्या गरजा भागवणारा होता. ही विशाल वृक्षराजी म्हणजे भारताचे वैभव ! पण इंग्रज व्यापारी

# एक लढा असाही

(भाग १)



म्हणून या देशात आले आणि राज्यकर्ते बनले. पण मुळात त्यांची प्रवृत्ती व्यापारीच होती. त्यांची दृष्टी या नैसर्गिक सुबत्ता असलेल्या भागावर पडली आणि येथील डौलदार वृक्षराजी पाहून त्यांच्या व्यापारी वृत्ती जाग्या झाल्या. या वनांवर त्यांनी जणू आपली मालकीच प्रस्थापित केली. येथील स्थानिक रहिवाश्याना बेदखल केले आणि आपल्या स्वार्थासाठी, औद्योगिक उपयोगासाठी बेसुमार वृक्षतोड सुरु केली. डोंगराळ भाग असल्याने वाहतूक करणे कठीण होते. अशा वेळी तोडलेले लाकूड नद्यांच्या खळाळत्या पात्रातून वाहून नेण्याचा सोपा आणि बिनखर्चिक उपाय त्यांनी अवलंबला. या जंगलात राहणाऱ्या स्थानिक लोकांच्या समस्यांमध्ये भर पडू लागली. येथील लोकांचे जीवनच या जंगलांवर अवलंबून होते. त्यांना लागणारे अन्न, वस्त्र, निवारा आदी साऱ्या गरजा हे जंगलच भागवत होते. डोंगर उतारांवर ही मंडळी थोडीफार शेती करत होती. सुरुवातीला त्यांना ही वृक्षतोडीची धग जाणवली नाही पण जसजसा काळ गेला, अधिकाधिक वृक्षतोड होऊन नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होऊ लागली तसतशी ही धग त्यांना जाणवायला लागली. हळूहळू ही मंडळी आपल्या हक्कांविषयी जागृत होऊ लागली. अर्थात १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रज या देशातून गेले. मग ही बेसुमार जंगलतोड, पर्यावरणाची हानी थांबली का ? त्यांचा हा कित्ता आपण कसा गिरवला हे पुढील भागात पाहू या.



## आनंदी पहाट

# समाजमाध्यमांचा उपयोग अभ्यासपूर्वक व्हावा

आधुनिक केसरी

समाज माध्यमांव्दारे आपली व्यक्तिगत स्वरूपातील कोणती माहिती किती द्यायची ह्याची सतत जाणीव होणे आवश्यक असते. अनेकदा आपले लोकेशन फेसबुकवर जाहीर केले जाते, आपण परगावी गेल्याच्या संदर्भातील पोस्टमुळे ही माहिती जगजाहीर होते आणि त्यामुळे अशा ठिकाणी घरफोड्या होतात. अनेकजणांना स्वतःच्या आजारपणामुळे घ्याव्या लागत असलेल्या औषधांची नावे, ती घेण्यामागील कारणे, त्यांतील प्रमुख घटक ह्यासंबंधी काहीच माहित नसते. त्या संबंधीचा आपला अभ्यास असावा ही बाब योग्यच आहे. म्हणून आपण स्वतःच्या अभ्यासातून औषध कोणते घ्यायचे, हे अजिबातच ठरवायचे नाही. परंतू डॉक्टरांनी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दिलेल्या औषधांची जुजबी माहिती असण्याचा उपयोग इमर्जन्सीच्या वेळी निश्चितच होऊ शकतो. पण औषधे विकत घेताना त्यांची वैधता, किंमत इत्यादी आपण तपासून घेत नाहीत. घरात शिल्लक राहिलेली औषधे फारशी वापरलीच गेली नाहीत, ती वापरण्यापूर्वी त्यांची वैधता आपण पाहत नाहीत.
अनेकदा खाण्याच्या परंतू नाशवंत वस्तू, काही पदार्थ ठराविक कालावधीतच वापरून संपवावे लागतात. अशा नेहमी न लागणाऱ्या वस्तूंची वैधता तरी त्या खायच्या, वापरायच्या अगोदर आपण नीटपणे काळजीपूर्वक तपासून पाहत नाहीत. अलीकडच्या काही काळापासून अनेकांना आभासी दुनियेचे प्रचंड आकर्षण वाटू लागले आहे. समाज माध्यमांच्याइतका विश्वास इतरांवर तर लांबच परंतू स्वतःवर देखील ठेवला जात नाही. सोशल मिडीयाच्या आहारी जाण्यामुळे आणि फसगत झाल्यामुळे सोशल मिडिया आपल्याला सोसत नाही, हे अभ्यासपूर्वक समजून घेण्याची गरज असते. गुगल काहीवेळा गुगली टाकत असते, हे लक्षातच घेतले जात नाही. सोशल मिडिया, गुगल, विविध वेबसाईट अनेकदा आपल्याला अत्यंत योग्य, चांगली, गरजेची, आवश्यक माहिती पुरवतात, परंतू नेहमीच तसे घडेल असेही नाही.



आधुनिक केसरी

## चरणी निवांत | ज्ञानाईच्या ||

पोसियला गर्भ | नऊ मास जीने ||
प्रसविले तीने | विश्वंभरा ||१||

फेडण्यास पांग | काया प्रगटली ||
विश्वाची माऊली | ज्ञानेश्वर ||२||

सांदिपान झाला | नाथ हा विरक्त ||
विष्णु झाला भक्त | ज्ञाना माझा ||३||

काय मी पामर | झालो भाग्यवंत ||
चरणी निवांत | ज्ञानाईच्या ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरुपण”

आधुनिक केसरी

**जगदम्ब नमस्तुभ्यं करुणामूर्तये नमः।**
**स्वाहास्वस्तिस्वधारूपं धारिणे च नमो नमः।। ३।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. हे करुणामूर्ती, नमस्कार असो. स्वाहा, स्वस्ति, स्वधा यांचे रूप धारण करणारे, (तुला) नमस्कार असो. नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं सर्वाभिष्टफलप्रदे।**
**सर्वारिष्टविनाशाय नमस्तुभ्यं नमो नमः।। ४ ।।**
जगदंबिके, सर्व अभिष्टफळ प्रदान करणारे, तुला नमस्कार असो. सर्व अरीष्टांच्या विनाशासाठी तुला त्रिवार नमस्कार असो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# नाम म्हणजे जादूचा दिवाच



आधुनिक केसरी

एकदा एक बाई सोवळे नेसून स्वयंपाक करीत होती. बाईचे मूल झोपून उठल्यावर, अंथरूणातच 'आई, मला घे,' म्हणून रडू लागले. आई म्हणाली, 'बाळा, मी तुला घ्यायला आतुर झाले आहे रे, पण तू कपडे तेवढे काढून ये'. परंतु मुलगा कपडे काढायला तयार होईना, आणि 'आई, आई' म्हणून रडू लागला. तेव्हा शेजारच्या बाईने येऊन मुलाचे कपडे काढले, आणि मग आईने मुलाला पोटाशी घेतले. आपलेही त्या लहान मुलाप्रमाणे झाले आहे. वासना, विकार, अहंभाव इत्यादींचे कपडे न काढताच आपण परमेश्वराला भेटायची इच्छा करतो, मग त्याची नि आपली भेट कशी होणार ? परमेश्वर मातेप्रमाणेच अत्यंत प्रेमळ आणि ममताळू आहे, त्याला आपल्याला भेटायची अतिशय इच्छा आहे; परंतु जोपर्यंत आपण आपल्या अंगावरची अपवित्र आवरणे काढून टाकीत नाही, तोपर्यंत परमेश्वर आपल्याला जवळ घेत नाही.
संत आपल्याला परमेश्वराकडे जायचा रस्ता सांगतात. त्या मार्गाने गेलो तर आपल्याला खचितच भगवंताची प्राप्ती होईल. आपण पुराणात वाचलेच असेल की, श्रीकृष्णाकडे दुर्योधन आणि अर्जुन गेले असताना, श्रीकृष्ण परमात्म्याने सांगितले की, 'ज्याला मी हवा असेन त्याला माझे सैन्य आणि इतर गोष्टी मिळणार नाहीत'. हे ऐकून, दुर्योधनाने त्याचे सर्व सैन्य मागून घेतले. अर्जुनाला खरा आनंद झाला की आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळते आहे, कारण तो हे जाणून होता की, एका परमेश्वरावाचून बाकी सर्व व्यर्थ आहे. प्राणावाचून हजारो शरीरांचा काय उपयोग ?
कोणी आपल्याला सांगतीलही की परमेश्वर साता समुद्रापलीकडे आहे, तो शेषशायी आहे. तेव्हा आपल्यासारख्या सामान्य माणसाला तो प्राप्त होणे अत्यंत कठीण आहे. परंतु संतांनी आपल्यावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. त्यांनी नामरूपी जादूचा दिवाच आपल्या हाती दिला आहे; त्यात सत्संगतीचे तेल घातले म्हणजे झाले. हा दिवा विझू नये म्हणून फार काळजी घ्यावी लागते. मी त्रिवार सत्य सांगतो की, नीतीने वागून जो नामात राहील त्याला नामाचे प्रेम लागल्याशिवाय राहणार नाही. नीती हा सर्वांचा पाया आहे. त्या पायाशिवाय इमारत टिकू शकणार नाही. तीन गोष्टी अत्यंत जपा : परस्त्री मातेसमान माना, परधन आणि परनिंदा विष्ठेसारखी माना, आणि कशाही परिस्थितीत नामस्मरणाला सोडू नका; तुम्हाला भगवंताचे प्रेम खात्रीने लागेल.
**आजचे बोधवचन :** मुखात नाम ठेवावे आणि सदाचरणाने वागून प्रपंच करावा.

**- श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# जीव कशासाठी पणाला लावावा ?

आधुनिक केसरी

दरवर्षी हेच होते. पोळा येतो. अंघोळीसाठी नेलेल्या बैलांसह एखादा शेतकरी तलावात घसरून मरण पावतो. हा तरुण शेतकरी त्याच्या कुटुंबाचे सर्वस्व असतो. (घरी दोन-चार बादल्या पाणी घेऊन बैल धुता आले नसते का?)
मग येते दहीहंडी. त्यात हिमालयापेक्षाही उत्तुंग थर लावण्याच्या नादात काही गोविंदा नावाचे तरुण जखमी होतात. एखादा मृत्युमुखी पडतो. मरणाऱ्याची संख्या एक असली तरी त्याच्या कुटुंबासाठी तो मुलगा सर्वस्व असतो. (त्याच्या पाठीला दोर बांधून पुढचे आयुष्य देता आले नसते का?)
मग येतात गणपती. त्यांचे दहा दिवसांनी विसर्जन. तेव्हाही खोल पाण्याचा अंदाज न आल्याने अनेक कोवळे भक्त बुडतात.
पूर पाहण्यासाठी गेलेला एखादा आगाऊ तरुण थेट पुराच्या पाण्यात उडी घेतो. पुढच्या गावात त्याचा मृतदेह सापडतो.
प्रेयसीचे लग्न झाले म्हणून आमच्या एका मित्राने फाशी घेतली. त्याला मरून तीस वर्षे झाली.
स्वतःहून विकेट फेकून दिल्यासारखे हे लोक मध्येच



मरून गेले.
या तरुणांना एखाद्या मोठ्या ध्येयासाठी प्राण पणाला लावता आले असते. पण त्यांनी ती संधी गमावली.
देशाच्या सीमेवर सैनिक प्राण पणाला लावतात.
'अंतराळातून परत येऊ की नाही' याची खात्री नसतानाही अंतराळवीर अनंत अवकाशात झेपावतात.
कोविडशी लढताना अनेक सेवाभावी तरुण प्राणांची पर्वा न करता रुग्णांना मदत करतात.
एखाद्या रोगावर लस शोधल्यानंतर अनेक शास्त्रज्ञ ती स्वतःलाच टोचून आपला जीव डावावर लावतात.
धगधगत्या आगीत शिरून अग्निशमन दलाचे जवान जिवावरचा धोका पत्करतात.
वाटेत पेरलेल्या सुरुंगाने कोणत्याही क्षणी चिंधड्या उडतील हे माहीत असतानाही जिगरबाज पोलिस नक्षलवाद्यांच्या इलाक्यात घुसतात, लढतात.
जीव कशासाठी पणाला लावावा हे कळले पाहिजे.
तरच त्या धीरोदात्त मृत्यूचाही सोहळा होतो...



विनोद जैतमहाल
मो. 9823028332

# भाजीपाल्यांचे भाव कडाडले !

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** पावसामुळे फळभाज्यांच्या प्रतवारीवर परिणाम झाला असून पितृपंधरवड्यांमुळे भाज्यांना मागणी वाढली आहे. फळभाज्यांच्या दरात २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली असून दर आणखी वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. पितृपंधरवड्यात मेथी, अळू, गवार, भेंडी, कारली तसेच कोथिंबिरीच्या मागणीत वाढ होते. मध्यंतरी पावसाने उघडीप दिल्यानंतर फळभाज्यांची आवक सुरळीत होती. गणेशोत्सवापासून पुणे विभागातील पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यात पाऊस सुरू झाला. मुसळधार पावसामुळे काढणीस आलेल्या फळभाज्यांचे मोठे नुकसान झाले.

पितृपंधरवड्यात भाज्यांच्या मागणीत वाढ होते. मात्र, गेले आठवडाभर पुणे विभागात सुरू असलेल्या पावसामुळे भाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे. भाज्या भिजल्या असून प्रतवारीवर परिणाम झाला आहे. गणेशोत्सवात पावसाने उघडीप दिली असती तर पितृपंधरवड्यात चांगल्या प्रतीच्या भाज्यांची आवक झाली असती. यंदा पावसाचा मोठा फटका भाजीपाल्याला बसला आहे.

पावसामुळे भाज्या खराब होत आहेत. त्यामुळे चांगल्या प्रतीच्या फळभाज्यांच्या मागणीत वाढ झाली असून दरात २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे पुण्याच्या किरकोळ बाजारातील भाजीपाला व्यापारी प्रकाश ढमढेरे यांनी सांगितले.

बाजारात मेथी ३५ ते ४० रुपये जुडी, कोथिंबीर २५ ते ३५ रुपये जुडी, अळू १२ ते १५ रुपये गड्डी, गवार १०० ते १२० रुपये किलो, भेंडी ७० ते ८० रुपये किलो, तर कारली ७० ते ८० रुपये दराने विकल्या जात आहे.

# संपत्तीचा वाद; प्राध्यापकाच्या खुनाचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संपत्ती मध्ये हिस्सा मागेल या संशयावरून कॉन्ग्रेस कार्यकर्त्यांच्या मुलाने व पुतण्याने प्राध्यापकाच्या खुनाचा प्रयत्न केला या प्रकरणी छावणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. प्राध्यापकाच्या पत्नीने पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांच्याकडेही दाद मागितली आहे. त्यामध्ये जवाहरनगर पोलिसांनी लक्ष दिले असते तर आज खुनाचा प्रयत्न झाला नसता असे म्हटले आहे

**दोण जण अटकेत**

विशाल बबन डिडोरे व विजय प्रभाकर डिडोरे अशी अटक आरोपीची नावे आहेत.या व अन्य तिसऱ्या आरोपीने संजय राधाकिसन पाथ्रीकर (३६)रा होनाजीनगर जट वाडा यांच्यावर गोलवाडी टोलनाक्या जवळ सोमवारी दुपारी कार आडवी लावून खुनी हल्ला चढवला. व कार मध्ये टाकून बबन डिडोरे यांच्या भानुदासनगर येथील घरासमोर बेशुद्धावस्थेत आणून टाकले व मोबाईल काढून घेतला. या नंतर त्याच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरु होते ते शुद्धीवर आल्यावर छावणी पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवला . आरोपी विशाल हा काँग्रेस चे माजी उपाध्यक्ष बबन डिडोरे यांचा मुलगा आहे तर विजय हा पुतण्या आहे . पोलीस तपासात उघड झालेली माहिती अशी की, बबन डिडोरे यांनी ९ वर्षांपूर्वी त्यांच्या सासूचे अंदाजे ५ कोटी रुपयांचे देवगिरी महाविद्यालय परिसरात असलेले घर स्वताः विकत घेतल्याचे खोटे दस्त ऐवज बनवले व ५० लाख रु सासूच्या खात्यावर जमाकेले व एक आठवड्यानंतर काढून घेतले. त्यांच्या सासूला पाच मुली व एक मुलगा होता त्या मयत मुलाच्या जावायावर म्हणजेच प्रा.. पाथ्रीकर यांच्यावर डिडोरे कुटुंबाने जीव घेणाहल्ला केला. कारण प्रा. पाथ्रीकर यांची पत्नी प्रा.सोनाली या आजीच्या घरामधे हिस्सा मागतील अशी भिती डिडोरे कुटुंबियांना सतावत आहे. प्रा.सोनाली यांच्या सख्या आत्याचे बबन डिडोरे पती आहेत.९ तारखेला प्रा. संजय यांची पत्नी प्रा. सोनाली तिच्या आजीला भेटण्यास बबन डिडोरे यांच्या घरी चारही आत्यां सोबंत गेल्या होत्या त्यावेळेस डिडोरे यांच्या मुलीने ही सोनाली यांना शिवीगाळ करंत मारहाण केली. या प्रकरणी जवाहरनगर पोलीस ठाण्यात अदखल पात्र गुन्हा दाखल आहे. ही तक्रार मागे घेण्यासाठी प्रा. संजय पाथ्रीकर यांच्या खुनाचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय पांडुरंग भागिले करत आहेत

# नितीन पाम्पट्टीवारचे जेईई ॲडव्हॉन्समध्ये यश



आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** येथील प्रथमेश पाम्पट्टीवार याने जेईई Advance च्या परीक्षेत ९९ .५२ एवढे गुण घेऊन यश संपादन केले आहे. तो वर्ग १० वी मध्ये जेट किड्स स्कूलमध्ये त्याने ९८ टक्के गुणमिळवून जिह्यातुन तिसरा आला होता. वर्ग १२वी मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेजमध्ये ९४ .५० % मिळवून तिथेही तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. Comed k परीक्षेमध्ये ५३९ वा रँक प्राप्त केला, VIT Vellore परीक्षेमध्ये ३१६५वा रँक प्राप्त केला. नुकत्याच झालेल्या जेईई मेन्स मध्ये ९९ .५२ percentile प्राप्त केले. प्रथमेशने विविध परीक्षा देऊन तिथेही यशाची परंपरा कायम राखली. प्रथमेशच्या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. प्रथमेश त्याच्या यशासाठी त्याचे पालक, नागपुर येथील त्याचे शिक्षक तसेच पुसद येथील प्रा. आहळे सर, प्रा. खर्चे, प्रा. कडस्कर तसेच प्रा. शुक्ला सर यांना यशाचे विशेष श्रेय देतो. प्रथमेशचे वडील नितिन पाम्पट्टीवार एलआयसी विभागात आहेत तर आईस्थानिक महाविद्यालयात संस्कृतच्या व्याख्याता आहे. त्याच्या यशाबदल अभिनंदन करण्यात येत आहे .

# उत्तम परताव्याचे आमिष दाखवत तेवीस लाखांना गंडवले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ९ महिन्यापूर्वी सोशल मिडीयाच्या माध्यमातून अमेरिकेतील बोस्टन येथील फेडिलिटी इन्व्हेस्टमेंट या कंपनीत २२ लाख ४२ हजार रु गुंतवणुकीचचा उत्तम परतावामिळेल या अमिषाला बळी पडलेल्या व्यापाऱ्याला फसवले . या प्रकरणी हर्सूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून याचा तपास आर्थिक गुन्हेशाखेकडे दिल्याची माहिती पोलीस निरीक्षक अमोल देवकर यांनी दिली. हेमचंद्र दपाडू चिरमाडे(४२) रा म्हसोबानगर हर्सूल असे फसवले गेलेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे चेरमाडे यांनी व्होटसाइप वर जानेवारी २२ मध्ये फेडिलिटी इन्व्हेस्टमेंट हा ग्रुप जॉईन केला ग्रुप मधील ऐडमिन महिलांनी मारलेल्या थापांना बळी पडून चिरमाडे यांनी फेडिलिटी कंपनीत २२ लाख र ४२ हजार रु. गुंतवले प दोन भामट्या ऐडमिन महिलांनी चिरमाडे यांची रक्कम हडप केली या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक दादाराव शिनगारे करत आहेत

# पैठण अन्नछत्रालयाच्या वतीने मुख्यमंत्र्याचा सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे हे पैठण दौर्यावर आले होते. या ठिकाणी मंत्री संदिपान भुमरे यानी सभेचे आयोजन केले होते त्या निमित्ताने मुख्यमंत्री शिंदे यांनी संत एकनाथ महाराज समाधी मंदिरातही भेट देवून नाथांच्या समाधिचे दर्शन घेतले त्यावे संत एकनाथ महाराज संचलित श्री.हरी कृपा सेवा समितीच्या वतीने सुरू असलेल्या अन्नछत्रालयाच्या वतीने अध्यक्ष सतिष,उदावंत,भगवान मिटकर व सेवेकर्यानी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचा सत्कार केला.

# शिंदे गटाच्या शहर व जिल्हा उपप्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा. :** भास्तन येथे जळगाव जामोद शहर जिल्हा परिषद सर्कल निहाय शिवसेना तालुका उपप्रमुखांचे नियुक्त्या जिल्हा संपर्क प्रमुख खासदार प्रतापरावजी जाधव मा जिल्हाप्रमुख शांतारामभाऊ दाणे यांचे हस्ते करण्यात आल्या. यावेळी ता शिवसेना प्रमुख अजय पारस्कर,नंदुभाऊ पाटील, गजानन देशमुख,बाळु पाटील,शिवा वाघ याचे उपस्थित करण्यात आल्या नवनियुक्त जळगाव शहर प्रमुख पदी अरुण पांडुरंग ताडे,जि.प.सर्कल जामोद ता.उपप्रमुख पदी संजय पांडुरंग धुळे,जि.प.सर्कल पिपळगाव ता.उपप्रमुख पदी विठ्ठलसिह शामरावसिह चव्हाण,वडशींगी जि.प.सर्कल ता.उपप्रमुख पदी विजय सारंधर शित्रे तर विभाग प्रमुख पदी दिपक माजरे यांची तर जामोद सर्कल विभाग प्रमुख पदी गोपाल रामेश्वर मानकर यांची नियुक्ति करण्यात आली. यावेळी श्रीकांत कंडारकर उपरपंच मडाखेड,अनंता हुरसाड,मडाखेड अनंत बकाल,एकनाथ कोकाटे गोपाल पाटील, अतुल ढगे,गजानन कापरे,धोंडुसिह राजपूत,वाघ,परशराम धुर्डे यांनी शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश केला.



# अजितदादांची मागणी

आधुनिक केसरी

महाराष्ट्र राज्यासाठी महत्वपूर्ण असणारा 'वेदांता' ग्रुपचा सेमीकंडक्टर व डिस्पले फॅब्रीकेशनचा प्रकल्प तळेगाव एमआयडीसीत साकारण्यात येणार होता. त्यासाठी महाविकास आघाडी सरकारच्या काळात विशेष प्रयत्न करण्यात आले होते, त्यादृष्टीने सर्व पुर्तता करण्यात आली होती. मात्र दोन लाख कोटींची गुंतवणुक असणारा आणि दीड लाख जणांना रोजगार उपलब्ध करुन देणारा हा महत्वपूर्ण प्रकल्प गुजरातमध्ये नेण्याच्या हालचाली सुरु आहेत. महाराष्ट्रासाठी हा निर्णय अत्यंत दुर्दैवी असून राज्याच्या औद्योगिक प्रगतीला बाधा आणणारा आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणावर याचा दीर्घकालीन परिणाम होणार असून महाराष्ट्राच्या हितासाठी राज्यसरकारने यात तातडीने हस्तक्षेप करत महाराष्ट्राबाहेर जाणारी गुंतवणुक थांबवत हा प्रकल्प पुन्हा महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून आज केली. राज्यातील विविध प्रश्नांसंबंधी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. 'वेदांता' ग्रुप व तैवान येथील फॉक्सकॉन या कंपनीचे ६०:४० असे जॉईन्ट व्हेंचर असणारा महाराष्ट्रासाठी महत्वपूर्ण असणारा सेमीकंडक्टर (गाड्यांसाठी चीप जे सद्या चायनामधून आयात होते) व डीस्पले फॅब्रीकेशनचा तळेगाव येथे येणारा 'वेदांता' ग्रुपचा प्रकल्प राजकीय दबावापोटी गुजरातला जाण्याच्या वाटेवर आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणुक महाराष्ट्रात होणार होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्याविषयी विविधस्तरावर विशेष प्रयत्न करण्यात आले होते. या प्रकल्पाच्या माध्यमातून दीड लाख जणांना रोजगार उपलब्ध होणार होता. हा प्रकल्प उभारणीसाठी या कंपनीने महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्याबरोबर चर्चा केली असेही अजित पवार म्हणाले. मात्र 'वेदांत' ग्रुपच्यावतीने या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्यालाच प्रथम पसंती देण्यात आली होती. तसा अहवालसुध्दा कंपनीच्यावतीने तयार करण्यात आला होता. त्यादृष्टीने महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्योग विभागाशी बोलणी सुद्धा झाली होती. प्रकल्पाची जागा निवडीसाठी एकुण १०० मुद्दांचा विचार 'वेदांत' ग्रुपने तळेगाव टप्पा ४ ही जागा अंतिम करण्यात आली होती. तळेगाव येथील कंपनीच्या उभारणीसाठी आवश्यक असणारे इकोसिस्टिम, ॲटोमोबाईल व इलेक्ट्रीक हब, रस्ते, रेल्वे व एअर कनेक्टीव्हिटी, 'जेएनपीटी' बंदराशी असणारी कनेक्टीव्हिटी, उपलब्ध असणारे तांत्रिक मनुष्यबळ व महाराष्ट्र राज्याचे गुंतवणूक धोरण हे पोषक असल्याने 'वेदांत' ग्रुपने तळेगाव येथील एक हजार एकर जागेची निवड केली होती. मात्र राज्यात सत्तांतर होताच महाराष्ट्राच्या हिताचा असणारा हा प्रकल्प राजकीय दबावापोटी गुजरातमध्ये नेण्याचा घाट घातला जात आहे. महाराष्ट्राची गुंतवणूक गुजरातकडे नेण्याचा प्रयत्न असून महाराष्ट्राला आर्थिक मागास करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे राज्याचे 'जीएसटी'चे सुध्दा मोठे नुकसान होणार आहे. हा प्रकल्प गुजरातमधील धोलेरा येथे प्रस्तावित केला असून महाराष्ट्रातील तळेगावच्या तुलनेत ही जागा प्रकल्पाच्या उभारणीसाठी अगदीच सामान्य आहे. गुजरातचे मुख्यमंत्री व वेदांतचे प्रमुख हे सांमजस्य करार (एमओयू) करणार आहेत, असे कळते. महाराष्ट्रासाठी हा निर्णय अत्यंत दुर्दैवी आहे. अशा प्रकारची मोठी गुंतवणुक महाराष्ट्रात थांबण्यासाठी राज्य सरकारने तातडीने पाऊले उचलावीत आणि हा प्रकल्प पुन्हा महाराष्ट्रात आणावा अशी मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे.



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

# विज्ञानयुगातील विश्वकर्मा

आधुनिक केसरी

कर्नाटकचा भगीरथ म्हणून ओळखले जाणारे तसेच 'झिजलात तरी चालेल पण गंजू नका' हा संदेश तरुण पिढीला देणारे विज्ञानयुगातील विश्वकर्माचा मानल्या जाणारे महान अभियंता एम.व्ही. विश्वेश्वरैय्या यांचा जन्मदिवस १५ सप्टेंबर 'अभियंता दिन' म्हणून साजरा केला जातो. सर एम. विश्वेश्वरैय्या उपाख्य सर एम.व्ही.यांनी म्हैसूरजवळ कृष्णसागर नावाचे, आपोआप उघडझाप कारणऱ्या १७१ दरवाज्यांचे अजस्र धरण उभे करून अवघ्या जगाचे लक्ष आपल्या कामगिरीकडे वेधून घेतले होते.

कृष्णासागर धरण २० हजार एकर पेक्षा जास्त जमीनिचे सिंचन तसेच शेकडो शहरांना आणि खेड्यांना वीज पुरवठा करीत आहे. हजारो परदेशी पाहुण्यांना आश्चर्यचकित करून मोहवून टाकीत आहे. वृंदावन गार्डन्स, भद्रावती आर्यन अँड स्टील वर्क्स, जगभर प्रसिद्ध असलेले म्हैसूरचे चंदनी तेल आणि चंदनी साबण कारखाना, म्हैसूर विद्यापीठ तसेच दि स्टेट बँक ऑफ म्हैसूरच्या उभारणित मोलाचा वाटा असलेल्या एम. विश्वेश्वरय्यांचे नाव भारताच्या इतिहास मोठ्या आदराने घेतले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा विज्ञानाकडे विशेष कोणाचे लक्ष नव्हतं तेव्हा एकाच व्यक्तीने केल्या ह्या सर्व गोष्टी नक्कीच खूप महत्वपूर्ण आहेत.

विश्वेश्वरय्यांचा जन्म म्हैसूर राज्यातील कोलार जिल्ह्याच्या चिक्कबळ्ळापूर तालुक्यातील मुद्देनहळ्ळी या गावी १५ सप्टेंबर १८६१ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर उच्च शिक्षणासाठी कॉलेजमध्ये दाखल झाल्यावर त्यांच्याकडे शिक्षणासाठी पैसा व राहायला जागा नव्हती म्हणून त्यांनी शिकवण्या करून पैसा मिळविला व आपले शिक्षण पूर्ण केले. शिस्त हा सर एम.व्हीं. यांचा नेहमीच परवलीचा शब्द राहिला. तरुण विद्यार्थी असताना देखील त्यांनी कठोर परिश्रम केले. त्यांची प्रत्येक गोष्ट नीटनेटकी आणि स्वच्छ; काम अगदी नियमित व शिस्तबद्ध असे. असंच जीवन ते आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत जगले.

बी.ए.ची परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाल्यावर म्हैसूर सरकारने त्यांना मदत केल्यामुळे पुढे त्यांनी पुण्याला सायन्स कॉलेजमधून इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन पूर्ण केला. परीक्षांचे निकाल लागताच मुंबई सरकारने त्यांची नाशिकला असिस्टंट इंजिनियर म्हणून नोकरी केली त्यावेळी एम.व्ही. तेवीस वर्षांचे होते.

सिंध प्रांतातील सक्कर शहराला सिंधू नदीपासून पाणी पुरवण्यासाठी त्यांनी तयार केलेल्या योजनेची सर्व इंजिनिअरांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. पाणी वाया न जाता शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करता यावा यासाठी त्यांनी 'ब्लॉक सिस्टीम' नावाची नवी पद्धतच सुरू केली तसेच धरणातील वाया जाणारा पाण्याचा प्रवाह थांबवण्यासाठी लोखंडी दरवाज्यांची योजना केली. त्यांच्या या नवीन शोधाची इंग्रज अधिकाऱ्यांनी तोंड भरून स्तुती केली. हैदराबादला मूसा नदीला काबूत आणण्याची महत्वाची कामगिरी त्यांनी केली. नंतर विश्वेश्वरय्यांची म्हैसूर राज्यात मुख्य इंजिनियर म्हणून नेमणूक झाली. त्या काळात म्हैसूर राज्य हे आठ जिल्ह्यांचं लहानसं राज्य होतं. तिथं म्हैसूरचे महाराजा राज्य करीत होते. कालांतराने १९१२ साली मैसूरच्या महाराजांनी विश्वेश्वरय्यांना आपले प्रमुख मंत्री (दिवाण) म्हणून नेमले. म्हैसूरचे दिवाण असताना म्हैसूरच्या उत्कर्षासाठी त्यांनी अगणित कामे केली.

त्याकाळी भारतातील लोकांची परिस्थिती फार हलाखीची होती. शाळा खूप कमी होत्या. उद्योगधंदे नव्हते. नोकरी मिळवणं खूपच कठीण होतं. आपल्याजवळ असलेल्या तुटपुंज्या शेतीवरच अवलंबून राहावे लागत असे, आवश्यक गरजांच्या वस्तूसुद्धा परदेशातून मागवाव्या लागत असत.



शेतकऱ्यांची स्थिती फारच दयनीय होती ते पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असत. शेतकऱ्यांची शेती करण्याची पद्धती व साधनेही जुने पुराणी तसेच परंपरागत होती. खेड्यापाड्यांमध्ये दवाखाने, रस्ते नव्हते. अज्ञान, दारिद्र्य आणि आजारीपण यांनी लोक ग्रासलेले होते. म्हणूनच एम.व्हीं.नी इंजिनिअर या नात्याने केवळ इमारती बांधणं, रस्ते तयार करणे, पूल बांधनं एवढ्यावरच संतुष्टता मानली नाही. लोकांचे अज्ञान दारिद्र्य व आजारपण नष्ट व्हावं, म्हणून विश्वेश्वरय्यांनी एक आर्थिक परिषद निर्माण करण्याची सूचना केली.

विश्वेश्वरय्यांनइ उभारलेले म्हैसूर जवळील कृष्णराजसागर धरण ५० चौरस मैलांचे असून या धरणामुळे आजूबाजूच्या सर्व भागांचे भाग्य उजळले आहे. ह्या धरणाच्या बांधकामाच्या काळात भारतात सिमेंटचे उत्पादन होत नव्हतं पण आपल्या इंजिनियर्सनी सिमेंट पेक्षाही मजबूत चुना तयार केला. ह्या धरणाने मैसूर राज्याला भरपूर वीज दिली.

नीटनेटके कपडे हे विश्वेश्वरय्यांचं खास वैशिष्ट्य होतं. कुठलीही गोष्ट योजनाबद्ध, सुरळीत, घाई न करता करणे ही त्यांची काम करण्याची पद्धत होती. भेटीला येणाऱ्या लोकांना वेळेवर भेटण्याचं ते कटाक्षाने पाळत असत.

शिक्षणाचे मोल जाणून त्यांनी शाळा सुरू केल्या, मुलींसाठी महाविद्यालयात व वसतीगृह उघडलं. विश्वेश्वरैयांच्या दृढ निश्चयाने आणि लढ्याने म्हैसूर विद्यापीठाची निर्मिती झाली. लोकांना जीवनोपयोगी शिक्षण द्यावं असं एम.व्हीं.ना वाटे म्हणूनच एक शेतकरी महाविद्यालय सुरू करण्यात आलं. आधुनिक पद्धतीने शेती कशी करावी, हे तिथे शिकविले जाई. एक इंजिनिअरिंग कॉलेज उघडण्यात आलं 'विश्वेश्वरय्या कॉलेज ऑफ इंजीनियरिंग', हे कॉलेज सध्या बेंगलोर विद्यापीठ चालवते. मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्कूल उघडण्यात आलं. प्रत्येक जिल्ह्यात एक औद्योगिक शाळा उघडण्यात आली.

आधुनिक जगात उद्योग हा देशाचा कणा होय ही गोष्ट विश्वेश्वरय्यांना पूर्णपणे माहीत होती. उद्योग वाढला तरच देशाची प्रगती होऊ शकते. देशात खनिज संपत्ती आहे. जंगले आहेत. उत्कृष्ट बंदरे आहेत. वीज उत्पन्न होऊ शकेल अशा नद्या आहेत, पण या सर्वांचा उपयोग आपल्या बुद्धिमत्तेनं व कठोर परिश्रमानं केला तरच देशातील उद्योगधंद्यांची सुधारणा होईल. प्रगती होईल मग बेकारी राहणार नाही, नोकऱ्या मिळतील, देश खऱ्या अर्थाने श्रीमंत होईल, परदेशातून वस्तू आयात करण्याची आवश्यकता भासणार नाही, उलट आपल्या देशात उत्पन्न केलेल्या वस्तू दुसऱ्या देशात विक्रीसाठी पाठवू शकू याची विश्वेश्वरय्यांना जाण होती म्हणून त्यांनी अनेक उद्योगधंदे निर्माण केले. त्यांनी म्हैसूर राज्यातील रेशीम उद्योगात अवर्णनीय सुधारणा केल्या.

दि सॅंडल ऑइल फॅक्टरी, मेटल फॅक्टरी, सोप फॅक्टरी, द क्रोम टाइमिंग फॅक्टरी हे सगळे उद्योग त्यांनी सुरू केलेले आहेत. भद्रावती आयर्न अँड स्टील वर्क्स हा कारखाना त्यांनी सुरू केलेला कारखाना देशाला वरदान ठरला आहे. देशाच्या उत्कर्षासाठी, विकासासाठी बँकांच्या मदतीची गरज असते हे त्यांना माहीत होतं. त्यांच्या सूचनेमुळे बँक ऑफ म्हैसूर सुरू करण्यात आली. या बँकेच्या निर्मितीसाठी सर एम.व्ही. यांनी सर्वप्रकारे मदत केली.

एम. व्ही. जादूगार होते की काय, कोण जाणे. पण आश्चर्य वाटतं साठ वर्षात जे इतरांकडून होऊ शकलं नसतं, ते एम. व्हीं.नी सहा वर्षात केलं. ओरिसातील नद्यांना वारंवार पूर येत. लोकांना त्याचा खूप उपद्रव होई. त्या नद्यांना काबूत आणून त्यांच्या व्यर्थ जाणाऱ्या पुराच्या पाण्याचा लोककल्याणासाठी उपयोग करणे आवश्यक होतं. सर एम.व्हीं.नी या सर्व समस्यांचा अभ्यास करून एक अहवाल तयार केला त्यांच्या अहवालानंच हिराकुड हिराकुंड आणि काही मोठ्या धरणांचा यांचा मार्ग सुलभ झाला. भारतरत्न विश्वेश्वरय्यांच्या योग्यतेचा मंत्री लाभणं हे कोणत्याही राज्याचे सुदैवच होय. राष्ट्रबांधणीसाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या एम.व्हीं. यांना ब्रिटिश सरकारने 'सर' किताब दिला. मुंबई, कोलकता, पाटणा, अलाहाबाद, म्हैसूर विद्यापीठांनी त्यांना डी. लिट. पदवी देऊन सन्मानित केले. भारत सरकारने १९५५ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान करून त्यांना मानवंदना दिली.

विश्वेश्वरय्या म्हणजे एक मानवी रत्नच होय. विश्वेश्वरय्या म्हणजे बुद्धिमत्ता, अलौकिक प्रतिभा. त्यांनी शोधून काढलेल्या ब्लॉक सिस्टीम, धरणाचे आपोआप बंद होणारे दरवाजे लोखंडी दरवाजे, एडन शहराला केलेल्या पाण्याचा पुरवठा व सांडपाण्याची योजना या सर्व गोष्टींची जगातील सर्व इंजिनियरांनी खूप स्तुती केली आहे. कृष्णासागर धरण तर त्यांच्या अप्रतिम बुद्धिमत्तेचं प्रतीक आहे.

एम.व्हीं.नी हजारो कुटुंबांना अन्न आणि शिक्षण दिलं. लक्षावधी घर त्यांच्यामुळे विद्युत प्रकाशानं उजळून निघाली. त्यांनी देशाला प्रगतीच्या मार्गाला लावलं. त्यांनी निर्माण केलेले भद्रावती स्टील फॅक्टरी, म्हैसूर विद्यापीठ, कृष्णराजसागर आणि बँक ऑफ मैसूर यातील प्रत्येक गोष्ट प्रचंड आणि भव्य आहे पण त्याहीपेक्षा उत्तुंग प्रतिभेचे, अनुपमेय कर्तृत्व लाभलेले भारतरत्न विश्वेश्वरय्या जास्त भव्य आणि उदात्त आहेत. विश्वेश्वरय्या आधुनिक म्हैसूरचे निर्माता होते १९४४ मध्ये झालेल्या तंत्रज्ञांच्या असोसिएशन परिषदेचे अध्यक्ष होते. सुनियंत्रित आचरण, कठोर परिश्रम, प्रसन्नता, संयम आणि प्रचंड आशावाद ही आपल्या दीर्घ जीवनाची पंचसूत्री मानणारा हा भारताचा महान तंत्रज्ञ कर्मयोगी वयाच्या १०१ व्या वर्षी १४ एप्रिल १९६२ रोजी अनंतात विलीन झाला. आजच काय 'नवभारताचा एक निर्माता' म्हणून त्यांचे कार्य कायमच लक्षात राहील.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# आईचे जाणे मरणानंतरही जगणे शिकवून गेले!

आधुनिक केसरी

आई गेली तेव्हा मी तिच्या जवळ नव्हतो. दोनच दिवसांपूर्वी तिला भेटून परतलो होतो. तिला दवाखान्यातून घरी आणले. वय झाल्याने थकली होती. तशात कॅन्सरचे निदान झालेले. पण तिची सहनशक्ती जबरदस्त होती. मला आई-वडिलांचा सहवास फारसा लाभला नाही. मी दीड वर्षांचा असतानाच माझी रवानगी आजीकडे झाली. माझ्या पाठीवर बहीण आली. दोन लहान मुलांना कसे सांभाळायचे अन् तेही लहानशा खेड्यात, या विचाराने मला आजीच्या पदरात घातले.त्यामुळे खऱ्या अर्थाने तीच माझी आई. मला तशा दोन आया. एक जन्म देणारी, दुसरी पालन-पोषण करणारी. एक कौसल्या, दुसरी यशोदा.

कळायला लागल्यानंतर, मोठा झाल्यावर शाळेला सुट्या लागल्या की उन्हाळ्यात मी आई-वडिलांकडे जात असे. तेव्हा माझे खूप लाड व्हायचे. शाळेत हुशार, पहिला नंबर म्हणून खास कौतुक. मला आठवते. अकरावी बोर्डाचा निकाल मला तारेने कळला तेव्हा मी आई जवळच होतो.बोर्डात मेरिटमध्ये आल्याने त्या लहानशा खेड्यात गोडधोडाचे वाटप झाले. आई सुगरण होती. तिला कामाचा, स्वयंपाकाचा कंटाळा नसे. माझे वडील टूरवरून रात्री परतायचे. त्या वेळी ती त्यांना गरम पोळ्या करून वाढायची! पदार्थ करताना कंजुषी नसे. खर्चाच्या बाबतीत हात सढळ. बँक अस्तित्वात असते हे आई-वडिलांना माहिती नसावे. त्यामुळे या हाताने आलेला पैसा त्या हाताने खर्च करण्याची सवय. साहजिकच माझ्या पाठच्या सहा भावा बहिणींच्या शिक्षणाचे हालच झाले. आजी काकाकडे नागपूरला वाढल्याने मी त्यातून बचावलो. हे माझ्यावर त्यांनी केलेले फार मोठे उपकारच म्हंटले पाहिजेत.

आईचं माहेर काटोलचं. तोही गोतावळा असाच संख्येने पसरलेला. सहा बहिणी, एक भाऊ! आमचे आजोबा शाळेत शिक्षक होते. मला कधी कधी प्रश्न पडतो. अगदी मध्यम आर्थिक परिस्थितीतही त्या पिढीन संसार, मुलीची लग्न, बाळंतपणं,इतर व्यवहार हे कसं केलं, सांभाळलं? मी आईला कधी वैतागलेले, खचलेल पाहिलच नाही.आर्थिक झळा, कौटुंबिक संघर्ष त्या पिढी नेही भोगला असेलच. पण आजच्यासारखा आक्रस्ताळेपणा त्या पिढीत नव्हता हे खरं.


आई सावळी होती. पण तिचा चेहरा फोटोजिनिक होता. मी देखील पत्नी निवडली ती सावळी. कातडीच्या रंगापेक्षा हृदयाचे रंग मला जास्त भावतात. आई फार शिकलेली नव्हती. पण शेवट पर्यंत पोथ्या वगैरे वाचायची. मला पत्र लिहायची. पण त्या पत्रात एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याशी संबंध नसे. व्याकरणाला सोडचिठ्ठी दिलेली असे. मला सगळे संदर्भ बरोबर समजत.मधूनच नातवांना आशीर्वाद,कुणा दुसऱ्या नातीचे कौतुक,मधूनच पैशाची मागणी अशी सरमिसळ असे!

मी कुलगुरू झाल्याची बातमी पेपरात आली. नागपूरचे काही पत्रकार पत्ता शोधत तिच्याकडे घरी गेले तिची मुलाखत घ्यायला. दुसऱ्या दिवशी तिच्या मुलाखती छापून आल्या, तिच्या फोटोंसह. त्याचा तिला केव्हढा आनंद! माझे पेपरात प्रसिध्द होणारे लेख ती आवर्जून वाचायची. तशी ती आमच्याकडे फारशी राहिली नाही. घर सोडून ती दुसरीकडे फारशी गेलीच नाही. अपवाद फक्त माहेरचा. तिला माहेरचेच जास्त कौतुक! घरी गेलं की एखाद्या पदार्थाचे नाव घेण्याची देर,तो पदार्थ एका तासात गरमागरम तयार. पुडाची कोथिंबीर वडी,वाटल्या डाळीचे लाडू, पुरण पोळी,सारे करण्याचा उत्साह. माझ्या मुलांना तिच्या हातचे बटाट्याचे पापड,सांडगे,मिरच्या,हे प्रकार खूप आवडायचे.मुलाच्या परदेशाच्या प्रवासात या पदार्थांसाठी जागा असेच. ती गेली त्याच्या दोन दिवस आधी मी तिच्या जवळ होतो.तब्येत बरी नसतांना देखील तिने विशिष्ट डब्यातले पदार्थ नातवा साठी काढून द्यायला सांगितले, अंथरुणावरून.हे सामान परदेशात आता तिच्या नातवाकडे कसे पोहोचवायचे ही आम्हाला चिंता. तिचे समाधान तिला मिळाले. ती मुक्त झाली साऱ्यातून!लहानपणी तिच्या तोंडून ऐकलेले एक गीत चांगले स्मरणात आहे.. चालीसह.. उपवनी गात कोकिळा, रसिक राज तिज दिसला, जीव जीवा सापडला.. उपवनी. माझ्या हुषारीचे लेखनाचे,मान सन्मानाचे फार कौतुक होते तिला. मला आय आय टी तून पी एच डी मिळाली तेव्हा ती पदवी ग्रहण समारंभाला हजर होती. मी वीएनआयटीचा संचालक झालो तेव्हा ती किती सुखावली होती! पण त्या काळात मला झालेल्या त्रासाने चिंतावली देखील होती. मला जपून राहण्याच्या सूचना देत होती. तसे ती सुखी समाधानी जीवन जगली असेच म्हटले पाहिजे. शेवट यंत तिची चूल सुटली नाही हेही खरेच. दोन दिवस आधी ती डोळे दान करायचे म्हणत होती. अवयव दानाविषयी, देहदानाविषयी माझा लेख प्रसिध्द झाला होता. त्यातील माझी शेवटची इच्छा वाचून ती विचलित झाली होती .पण तिच्या डोळ्याचे ऑपरेशन झाले असल्याने नेत्रदान शक्य नव्हते.पण तिच्या अपुऱ्या इच्छे मुळे माझ्या देहदानाच्या निर्णयावर शिक्कमोर्तब झाले. आईचे जाणे मरणा नंतर ही जगणे शिकवून गेले!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# एकनाथ शिंदे यांचा झंझावात



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**सरकार आता अस्तित्वात आले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री समन्वयाने, एकदिलाने वेगवान निर्णय घेत सरकार एकदम जनताभिमूख निर्णय घेणारे असल्याचे दाखवून दिले. एकनाथराव तर नरेंद्र मोदींच्याही एक पाऊल पुढे टाकत दिवसाचे २४ तास काम करत आहेत. दौरे करत आहेत. समन्वय आणि सहकार्य यातून महाराष्ट्र पिंजून काढत धडाधड निर्णय घेत आहेत. विकास आणि हींदूहीत डोळ्यासमोर ठेवून देवेंद्रजीं चे योग्य मार्गदर्शना खाली सरकार काम करत आहे.**

एकनाथ संभाजी शिंदे, महाराष्ट्राचे गेल्या तीस जूलैपासूनचे मुख्यमंत्री. अनपेक्षितपणे भाजपाच्या शिर्षस्थ नेत्यांनी एकनाथरावांना बक्षिस दिले. ते त्यांनी केलेल्या चमत्कारामुळे आणि दाखवलेल्या धाडसामुळे. खरे तर 2019 मध्येच एकनाथराव मविआचे मुख्यमंत्री व्हायला हवे होते. परंतू सुभाष देसाई सारखे जेष्ठ नेते, थोडी खळखळ करतील असे वाटत असतानाच, शिवसेनेतून पूर्वीच बाहेर पडलेले छगन भुजबळ, साहेब जसे सतत भावी पंतप्रधान आणि भावी राष्ट्रपती आहेत, त्यांचेसारखेच सतत भावी मुख्यमंत्री दादा, सतत डावलले जाणारे जयंत पाटील, साहेबांचे गोटातील, दादा विरोधक दिलीप वळसे पाटील या लोकांचे जेष्ठतेचा विषय काढून आयुष्यात कोणतीच निवडणूक न लढवलेले, कोणताही प्रशासकीय अनुभव नसणारे आणि कोणतेच राजकीय कर्तुत्व नसलेले, नेतृत्व गुणांचा पूर्ण अभाव असणारे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना घोड्यावर बसवण्यात आले. बरे बसवले तर बसवले पण आपल्याच लोकांशी गद्दारी, बेईमानी करायला लावून, मुलाच्या भवितव्याची लालच दाखवत स्वतःकडेच मुख्यमंत्री पद घ्यायला भाग पाडले. नंतर त्यांच्या नवखेपणाचा, आजारपणाचा आणि बाईलबुध्दीने चालण्याच्या सवयीचा फायदा घेत महाराष्ट्र लुटला.

शिवसेनेतील असंतोषाला खतपाणी घालत, हवा देत, शिवसेनेच्या मंत्र्यांचा, आमदारांचा जमेल तीथे अवमान करणे चालू केले. एनसीपी ने पध्दतशिरपणे शिवसेनेला, संघटनेला छेद द्यायला सुरुवात केली. साहेबांना वाटले बाळासाहेबांचे मावळे उध्दव ठाकरेंना, बाळासाहेबांचेच आदेशानुसार सांभाळत राहतील आणि कोणतीही खळखळ करणार नाहीत. पण सत्तेच्या अडीच वर्षात फक्त अनागोंदी कारभार करत फक्त सहकारी पक्षांचे खच्चीकरण करणे हाच एकमेव कार्यक्रम राबवला. शेवटी काय झाले? एकनाथरावांनी पध्दतशिरपणे शिवसेने अंतर्गत आपला नाराजांचा गट एकसंघ केला. सोबत सहकारी अपक्ष आणि बच्चू कडूसारखे छोटे पक्ष नेतेही घेतले. बरे हरसंभव कोशिश करूनही एकही आमदार शिंदेंना सोडून परत फिरला नाही. उलट आजून दहा आमदार आणि चवदा खासदार सोबत आहे. म्हणजे एकनाथ शिंदे यांची भूमिका योग्य आहे हे पन्नास आमदारांना आणि पंधरा खासदारांना मान्य आहे.



शिवसेनेने हिंदूत्व सोडून सहकारी पक्षांचेच लांगुलचालन धोरण स्वीकारल्या मुळे सर्वचजण बिथरले होते. त्यात कोणतेही काम न होणे, कोणीच कैवारी नसने तथा विकास फंड न मिळने, मतदार संघातील मागण्या मान्य न होणे. सतत उपमर्द आणि अपमान सहन करावा लागणे आणि पक्ष नेतृत्वाचे दुर्लक्ष, अजिबातच भेटीची वेळ न देता दुखावणे ह्या सर्वांचा परिपाक म्हणजे मविआचे सरकारचे पतन. साहेब एवढा टोकावर असंतोष जाऊ देतील असे वाटत नव्हते. पण उध्वव ठाकरे काय आणि साहेब काय सर्वांना गृहीत धरून निश्चिंत राहीले. आणि 2014 पासून प्रचंड तयारीने , सर्वंकष अभ्यासाने आणि महाराष्ट्राच्या मुळ दुखण्यांचा विचार करून देवेंद्र फडणवीस मैदानात आहेत. त्यांच्या मी पुन्हा येणार ची खिल्ली उडवताना आपण मतदार मायबापाचा मतकौल डावलत आहोत हेही साहेब आणि उध्दव ठाकरे विसरले. साहेबांनी तर आम्हाला विरोधात बसण्याचा जनादेश असून, मतदारांनी निर्विवाद युतीला बहूमत दिले आहे असे जाहीर वक्तव्य केले होते.

तरीही उध्दव ठाकरेंना अमित शाह विरूध्द भडकवून बालीश, खोटे अश्वासनाचा बाऊ करत भाजप विरोधात आघाडी उघडली. तसे पाहिले तर देवेंद्रजींचा पाच वर्षांचा सत्ता काळ हा अतिशय उत्तम आणि पारदर्शक गेलेला होता आणि त्यांच्या मुळेच युतीला जनतेने भरभरून मते दिली होती. शिवसेनेला 56 आमदार निवडून आणणे कदापि शक्य नव्हते. भाजप आणि नरेंद्र मोदी यांचे नाव आणि देवेंद्र फडणवीस यांचा स्वच्छ, विकासाभिमुख आणि प्रगतीपथावरिल, पारदर्शक कारभार याचे जोरावर, पाचही वर्षे खिशात राजीनामे घेऊन फिरणारे शिवसैनिकसुध्दा निवडून आले.

एकनाथ शिंदे यांनी हीच नाराजीची नस पकडून, हिंदुत्वाचा जागर करित उध्दव ठाकरेंना जागा दाखवली. साहेबांना धोबीपछाड दिला आणि कॉंग्रेसला पंगूत्व आणले. देवेंद्र फडणवीस यांनी योग्य मार्गदर्शन करत, श्रेष्ठींना सविस्तर माहिती देऊन विश्वासात घेऊन एकनाथरावांना बळ दिले. त्यांना आणि त्यांच्या पन्नास समर्थक आमदारांना उपमुख्यमंत्री पद आणि चाळीस टक्के मंत्रीपदे अपेक्षित असतांना भाजप श्रेष्ठींनी अनपेक्षितपणे एकनाथरावांचे गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ घातली.

देवेंद्र फडणवीस सारख्या हरहुन्नरी, राजकीय डावपेचात पारंगत झालेल्या, यशस्वी नेतृत्वाला पक्ष शिस्तीचे नावाखाली उपमुख्यमंत्री पद स्वीकारायला भाग पाडले.

सरकार आता अस्तित्वात आले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री समन्वयाने, एकदिलाने वेगवान निर्णय घेत सरकार एकदम जनताभिमूख निर्णय घेणारे असल्याचे दाखवून दिले. एकनाथराव तर नरेंद्र मोदींच्याही एक पाऊल पुढे टाकत दिवसाचे २४ तास काम करत आहेत. दौरे करत आहेत. समन्वय आणि सहकार्य यातून महाराष्ट्र पिंजून काढत धडाधड निर्णय घेत आहेत. विकास आणि हींदूहीत डोळ्यासमोर ठेवून देवेंद्रजीं चे योग्य मार्गदर्शना खाली सरकार काम करत आहे.

एकनाथराव संयमीतपणे विरोधकांच्या प्रत्येक हल्ल्याला परतवत आहेत. आधीच देवेंद्र फडणवीस शरद पवारांचे तोडीसतोड डावपेच आखत साहेबांना अचंबित करत आहेतच त्यात आता एकनाथरावांसारखा प्रचंड उर्जा असणारा नेता सोबतीला आहे. एकदा का सर्वोच्च न्यायालयाने शिंदेंच्या बाजूने कौल दिला आणि सर्व स्थिरस्थावर झाले की हा कामाचा वेग आणखी वाढेल.

हे सरकार 2024 पर्यंत निश्चित पणे स्थिर शासन देणार. कालची पैठण जवळील सभा खरोखरच मोठी झाली. चंद्रकांत खैरे कांहीही म्हणोत एकनाथ शिंदे गट मजबूत असून सर्वसामान्य जनता त्यांचे सोबत आहे. देवेंद्र फडणवीस 2024 मध्ये बहूतेक केंद्रात जातील आणि एकनाथ शिंदेंचा गट भाजपमध्ये विलीन होऊन एकनाथरावांचेच नेतृत्वात महाराष्ट्र सरकार चालेल असे दिसते. दरम्यान शिवसेना, धनुष्यबाण संपेल. दादा ही स्वतंत्र विचार करतील. कॉंग्रेसचे सध्याचे 44 पैकी तीस आमदारही भाजपसोबत येतील.

# !! छंदात हरवलेली... राधिका !!



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**राधिका ही छंदात हरवलेली एक वेडी गृहिणी आहे... कोणत्याही छंदाचं आधी वेड लागतं... त्यांच्यामुळेच तो वेडा होऊन जातो त्यावेडामधूनच चांगल्या कलाकृतींची निर्मिती होऊन जाते हे बाकी खरं...राधिका गोपीनाथ पंडित (माजगावकर) हिने बालपणापासून अनेक छंद जोपासलेले आहेत. भरतकाम.. विणकाम... लोकरीच्या वस्तू तयार करणे.. वाचन.. ललित लेखन करणे... कथा लिखाण... हलव्याचे दागिने बनविणे.. वायरच्या पिशव्या बनविणे..स्पंजाच्या वस्तू.. विविध प्रकारची फुले बनविणे ...बाहुल्या बनविणे.. रांगोळ्या..पाककला... अशा अगणित छंदात राधिका हारवून गेलेली होती.**



राधिका पंडित


छंद म्हणजे.. मानवी मनाला सुखावून जाणारं एक सुंदर भावपूर्ण स्वप्न...छंद म्हणजे आपल्या जीवनातील जणू शरदाचं अलौकिक सौंदर्यपूर्ण चांदणंच ... छंद कोणताही असो...नाणी.. टपाल तिकीटे.. काडेपेटीची लेबल जमविणे.. पेंटिंग.. रांगोळ्या.. क्रिकेट.. अगदी भरतकाम.. विणकाम.. यामधून मिळणारा आनंद हा अनमोल असतो... मानवी मनाला भूरळ घालणारा छंद किती अनमोल ठेवा असतो हे शब्दांमधून सांगता येणार नाही हे बाकी खरं...

अशाच छंदात हरवलेल्या वेड्या मैत्रिणींची भेट झाली तीही छंदामुळेच बरका...माझे परममित्र दत्ता सरदेशमुख जे आवाजांचे अनिभिक्ष राजे आहेत. जळगाव..पुणे..आकाशवाणींचे ते बुलंदी आवाजाचे जणू बादशहाच आहेत...असो अशा या माझ्या जीवनातील एका नामवंत कलाकारांच्या मुळेच राधिकाची ओळख झाली तीही छंदामुळेच...

राधिका ही छंदात हरवलेली एक वेडी गृहिणी आहे... कोणत्याही छंदाचं आधी वेड लागतं... त्यांच्यामुळेच तो वेडा होऊन जातो त्यावेडामधूनच चांगल्या कलाकृतींची निर्मिती होऊन जाते हे बाकी खरं...राधिका गोपीनाथ पंडित (माजगावकर) हिने बालपणापासून अनेक छंद जोपासलेले आहेत. भरतकाम..

विणकाम... लोकरीच्या वस्तू तयार करणे.. वाचन.. ललित लेखन करणे... कथा लिखाण... हलव्याचे दागिने बनविणे.. वायरच्या पिशव्या बनविणे.. स्पंजाच्या वस्तू.. विविध प्रकारची फुले बनविणे ...बाहुल्या बनविणे.. रांगोळ्या..पाककला... अशा अगणित छंदात राधिका हारवून गेलेली होती.असं असलं तरी तिच्या लोकरीच्या विविध कलाकृती बनविण्याच्या छंदासाठी मी खूपच प्रभावित होऊन





गेलो...मग चला तर अशा छंद वेड्या राधिकाच्या सहवासात जावूयात नी तिच्या छंदा विषयी जाणून घेऊयात...हो ना...

राधिकाची भेट झाली. तिने छंदाची उकल केली.

माझे बाबा

शिक्षक नी आई गृहिणी आई.. बाबांच्या संस्कारातून मी अनेक छंद जोपासतच मोठी झाले. आम्ही विवाहानंतर जेव्हा भुसावळला होतो तेंव्हा शर्मा मैत्रिणीकडून (पंजाबी मैत्रिणींच्या) मी लोकरीचे विणकाम शिकले. माहेर पुणे मग भुसावळ ते पुण्याच्या बारा तासांचा प्रवासाचा हा वेळ लोकरीचे बाळांचे जॅकेट.. स्वेटर..मोजे.. टेबलावरील शोभिवंत विविध प्रकारचे रुमाल अशा गोष्टींमधून प्रारंभ झाला...मग पुढे हा छंद मी खूप विकसित केला.विविध प्रकारातील कमळे देखील लोकरी पासून तयार केली. त्या पुढे काही गोष्टी प्रदर्शनात पाहून मी शिकत गेले. कमळावर बसलेले गणपती चैत्रगौर..महालक्ष्मी.. राधाकृष्ण अशा कितीतरी देवदेवतांच्या प्रतिकृती या मी लोकरीच्या माध्यमातून तयार करायला शिकले.

राधिकाचं शिक्षण मॅट्रिक पर्यंत झालेलं होतं. घरची अर्थीक परिस्थिती नसल्याने मनात असुनही राधिका महाविद्यालयात जाऊ शकली नाही.राधिकाचे बाबा शिक्षकच होते. ते नेहमी म्हणत असतं शिक्षणाचं पाठबळ तुम्हाला मिळालं नाही तरी तुमच्या कला.. गुणांचा वापर करुन दोन पैसे मिळवायला जरुर शिका.राधिकांच्या बाबांना नाना म्हणतं असतं.

प्रसिध्द शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे हे राधिकाच्या बाबांचे एक परमप्रिय शिष्य होते.बाबासाहेब पुरंदरे यांचे घरी राधिका बऱ्याचदा जातं असे. .त्यामुळे पुरंदरेयांचा सहवासात राधिकाला मिळाला. त्यामुळेच राधिकाला लिखाणाची आवड निर्माण झाली.त्यामधूनच ती पुढे बाबासाहेब पुरंदरेयांच्याच मार्गदर्शनांनी राधिका एक उत्तम लेखिका म्हणून लोकांना परिचित झाली हेच खरं....

राधिकाचा विवाह गोपीनाथ पंडित ( माजगावकर ) यांच्या बरोबर झाल्यावर त्यांच्या पतीचे मोठं सहकार्य राधिकाला मिळालं.त्यांच्या कला गुणांना वाव आणि नवी दिशा देण्याचं मोलाचं काम त्यांच्या पतीनं केलं.. राधिकांच्या पती मुळेच त्यांना जळगाव आकाशवाणी केंद्रावर नवनवीन कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांचे कला गुण छंद यांच्या सादरीकरणासाठी मोठा वाव मिळत गेला. जळगाव आकाशवाणी केंद्रावरील निवेदक दत्ता सरदेशमुख यांच्या मोलाच्या मार्गदर्शनांतून राधिकाच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळालं.

विवाहा नंतर राधिका पुण्यातच स्थायिक झाली. तिचे वडिलांच्या बरोबरच बाबासाहेब पुरंदरे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनांतून राधिकाच्या लिखाणाला गती मिळाली.तिची मुलं राजेश व प्रसाद व तिचे जावई सुजीत जोशी यांच्या मोलाच्या मार्गदर्शनांतून राधिका चांगली लेखिका झाली. आज राधिकाच्या अगणित कथा या महाराष्ट्राच्या अनेक वृत्तपत्रांतून.. मासिकांतून.. दिवाळी अंकातून ही प्रसिद्ध झालेल्या आहेत.

आज राधिका ही लेखिका म्हणून साऱ्यांना माहीत असली तरी.. राधिकानी तिचा मुळं छंद लोकरीच्या विविध प्रकारच्या वस्तू करण्याची कला जोपासली नी विकसित देखील केलेली आहे.या छंदाबरोबरच पुण्यातील दातार आजींच्या कडून विणकामाची कलाही राधिका शिकली व नंतर चांगलीच विकसीत केलेली आहे.तसेच तिची मैत्रीण निला देशपांडे कडून देखील तिनें तिची कला विकसित केली. भविष्यातील तुझ्या संकल्पना काय आहेत... त्यावर राधिका म्हणाली...मी आजवर लोकरीच्या खूप गोष्टी बनवल्या. स्वकष्टांनी व मेहनतीने तयार केलेल्या वस्तू विकून चार पैसे कमावले.

आज मी सुस्थितीत आहे...मग जी बाळ.. छोटी मुलं निराधार आहेत..अनाथ आहेत अशा छोट्या मुलांसाठी मी लोकरीच्या विविध वस्तू स्वेटर ,मोजे ,जॅकेट तयार करून त्यांना देणार आहे. येणाऱ्या थंडीच्या दिवसात ही संकल्पना पूर्ण व्हावी हिच पांडुरंगाच्या चरणी मी प्रार्थना करीत आहे....

पाहुयात काय होतंय ते... आपल्या अनेक छंदात रमलेली ही उत्तम लेखिका असणारी राधिका... तिचं भविष्यातील हे स्वप्न पूर्ण व्हावे हिच अपेक्षा करुयात नी तिला शुभेच्छा देवूयात....

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माऊली जन्मस्थान आपेगावला भेट

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** राज्यातील सरकार सर्वसामान्य जनतेचे असून त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम या सरकारकडून निष्ठेने केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी सायंकाळी आपेगाव (ता.पैठण) येथे दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पैठण दौर्यावर आले आसता रोहयो मंत्री संदिपान भुमरे तसेच त्याचे सहकारी शिवाजी दिवटे आपेगावकर यांच्या मागणीला मान्य करत मुख्यमंत्री यांनी आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान येथे भेट देवुन श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांची जन्मभूमी असलेल्या श्रीक्षेत्र आपेगाव येथील माऊलींच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जन्मभूमीच्या दर्शनाने आपण भारावलो असून सर्वसामान्यांची सेवा करण्याची शक्ती माऊली निश्चितपणे देतील, अशी भावनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. दर्शनानंतर विश्वस्त मंडळ ज्ञानेश्वर महाराज व गावकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचा शाल, श्रीफळ, श्री संत ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रोहयो मंत्री संदिपान भुमरे, आमदार संजय शिरसाट, आमदार प्रदीप जैस्वाल, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना, मुख्यमंत्री यांचे सहकारी शिवाजी दिवटे,सौ दिवटे,भाऊसाहेब औटे,पोपट औटे,सह गावकरी आदी उपस्थित होते.

पैठण येथील नियोजित दौर्यात मुख्यमंत्री आपेगावाला भेट देवुन पाचोड येथे जाणार होते परंतु वेळेअभावी आपेगावाला न जाता मुख्यमंत्री थेट पैठण हुन पाचोडला गेले परंतु आपेगावकरानी सकाळपासूनच मुख्यमंत्री यांच्या आगमण प्रित्यर्थ गावात स्वागत कमानी व भव्य सत्काराचे नियोजन केले असता अचानक दौर्यात बदल झाल्याने आपेगावकर काही काळ नाराज झाले परंतु त्याचे सहकारी शिवाजी दिवटे यांनी पाचोड येथे जावुन विनंती करुन आपेगाव दौरा करण्यास भाग पाडल्याने गावकरी खुष झाल्याने गावात पुन्हा जल्लोषात स्वागत करण्यात आले.

# घोटा देवी संस्थानच्या सेवेकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**हिंगोली :** हिंगोली तालुक्यातील घोटादेवी मंदिरात भोजन कक्षात साफसफाई करून गजानन किशनराव जगताप यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना 14 सप्टेंबर रोजी बुधवारी सकाळी घडली आहे. घटनास्थळी मुख्यमंत्र्यांच्या नावे चिठ्ठी सापडली असून त्यात कार्याध्यक्ष व सदस्यांच्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलत असल्याचे नमूद केले आहे. हिंगोली तालुक्यातील घोटादेवी येथे तुळजादेवीचे ठाणे आहे. या ठिकाणी देवीचे मोठे मंदिर असून दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येतात. तर नवरात्र महोत्सवात याठिकाणी मोठी गर्दी होते. सध्या या ठिकाणी नवरात्र महोत्सवाची तयारीही सुरू आहे. दरम्यान, या मंदिरात अनेक वर्षापासून साफसफाईचे काम जगताप कुटुंबाकडे आहे. आज पहाटे साडेपाच वाजता गजानन जगताप व त्यांची पत्नी मंदिरात साफसफाईसाठी गेले होते. यावेळी गजानन हे मंदिराच्या वरील भोजन कक्षात साफसफाई करीत होते तर त्यांची पत्नी मंदिराच्या परिसरात सफासफाई करीत होते. मात्र बराच वेळ होऊन देखील गजानन हे खाली आले नसल्याने त्यांच्या पत्नीने भोजनकक्षाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी गजानन यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. त्यानंतर त्यांनी आरडा-ओरड केल्यानंतर घटनास्थळी गावकरी दाखल झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर नर्सी नामदेव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अरुण नागरे, उपनिरीक्षक रामराव पोटे, जमादार हेमंत दराडे, पांडूरंग डवणे यांचे पथक दाखल झाले आहे. नवरात्र महोत्सवाच्या तोंडावरच हा प्रकार घडल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# निलेश देशमुख यांना काव्य लेखन पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** येथील प्रतिभावान साहित्यिक निलेश रामराव देशमुख यांना अष्टपैलू संस्कृती कला अकादमी, मुंबई यांच्याकडून राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निलेश देशमुख यांना शालेय जीवनापासून वाचन व लेखनाची आवड आहे. विविध वर्तमानपत्र, साप्ताहिक, दिवाळी अंक, मासिकांमधून व सोशल मिडीयाच्या माध्यमातून त्यांचे साहित्य प्रकाशित होत असते. त्यांच्या साहित्यात राष्ट्र, समाज व निसर्ग यांना विशेष स्थान असते. साहित्य रसिक व वाचकांकडून त्यांच्या साहित्यास भरभरून प्रतिसादही लाभत असतो. मुंबई येथील अष्टपैलू संस्कृती कला अकादमीच्या वतीने घेण्यात आलेल्या सलग काव्य लेखन स्पर्धेमध्ये निलेश देशमुख यांनी दर्जेदार कविता सादर केल्या. या सर्व कवितांनी मिळून त्यांच्या साहित्याच्या शिरपेचात पुन्हा एक अष्टपैलू काव्य लेखन राज्यस्तरीय गौरव पुरस्कार प्राप्त झाला. त्याबद्दल त्यांना अष्टपैलू संस्कृती अकादमीचे अध्यक्ष किसन खैरे यांनी पुरस्कार देऊन सन्मानित केले. "आपल्या साहित्य कलेच्या सन्मानार्थ आपणास अष्टपैलू काव्य लेखन राज्यस्तरीय गौरव पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत असून संस्थेच्या या गौरव पुरस्काराने लोकमान्यतेची साहित्य गौरव मुद्रा आपल्या कर्तुत्वावर उमटल्याचा आम्हास विशेष आनंद होत आहे ", अशा शब्दात त्यांनी निलेश देशमुख यांचा गौरव केला आहे. यापूर्वीही त्यांना वेगवेगळ्या साहित्य मंडळ, साहित्य ग्रुप च्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे. "हा सन्मान केवळ माझा नसून माझ्या साहित्याचा, वाचक व रसिकांचा सुद्धा सन्मान आहे", असे मत निलेश देशमुख यांनी व्यक्त केले आहे.

# अनुदानित वसतिगृह अधीक्षक अधीक्षकेत्तर कर्मचारी संघटनेची स्थापना


आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** अनुदानित वसतिगृह अधिक्षक अधीक्षकेतर राज्यस्तरीय कर्मचारी संघटनेची स्थापना रविवारी संस्थापक अध्यक्ष एकनाथराव कांबळे, सतीश गोटमुकले, सुंदर कांबळे आदींच्या नेतृत्वाखाली भास्करराव टेहरे लॉन औरंगाबाद येथे राज्यातील अनुदानित वसतीगृह कर्मचाऱ्यांची एकत्रीकरणाची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यातील आजी माजी पदाधिकारी जिल्हाध्यक्ष महिला अध्यक्ष व सर्व कर्मचाऱ्यांना एकत्रित करून राज्यस्तरीय अनुदानित वसतीगृह अधीक्षक अधीक्षकेत्तर कर्मचारी संघटनेची स्थापना करण्यात आली.

या राज्यस्तरीय संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी आयुब शेख यांची तर प्रदेश सचिवपदी पंकज गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. इतर कार्यकारिणी कार्याध्यक्ष बाजीराव साबळे,उपाध्यक्ष चुनीलाल पवार, उपाध्यक्ष विनोद रोकडे,उपाध्यक्ष अमर चाऊस,महिला प्रदेशाध्यक्ष नसीम पठाण, महिला प्रदेश उपाध्यक्ष सुरजाबाई जाधव, मराठवाडा विभाग प्रमुख म्हणुन शिवशसांभ माताळ आदींची निवड करण्यात आली. या राज्यस्तरीय अनुदानित वसतीगृह अधीक्षक अधीक्षकेत्तर कर्मचारी संघटनेची एकत्रीकरणाची बैठकीसाठी जिल्हाध्यक्ष विशाल कदम, श्रीकांत सारूक,अविनाश राठोड, राजेश्वर जाधव, माधव सोनुले, विकास पवार, नरेंद्र देसले, तुळशीराम भोवर, पोपटी पारखे अनिल सावंत निर्मले सुनिल अंभोरे,प्रविण सूर्यवंशी,राजकुमार गाडवे, प्रविण कदम मजित शेख नारायण लोमटे नितीन टोरणे किरण मोरे व औरंगाबाद जिल्ह्यातील कर्मचारी आतिक शेख,मनोहर सोकटकर,अख्तर पठाण, विनायक घडामोडे, दलसिंग कहाटे, संतोष जाधव,प्रकाश मनगटे, सुभाष निकम, अशोक ताठे, सुनील चव्हाण, दामू चव्हाण, दामू ठोंबरे, विलास कोतकर,शुभम कांबळे, सुनील साबळे, संजय त्रिभुवन, अमोल पवार, अंबादास वाघमारे,सुनील पाटोळे,विजय गायकवाड,नाना बावस्कर , सचिन राजपूत, गौरव रोरे, आरती गायकवाड उपस्थित होते.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग – ०३

आधुनिक केसरी

१) हनिमून सिस्टायसीस हे मूत्राशयाचे इंफेक्शन होऊन संबंध आल्यानंतर कोव्हाही होऊ शकते.
२) यामुळे मूत्राशय व किडनी इंफेक्शन देखील होते.

**लक्षणे काय ?**

लघवीला जळजळ होणे, वारंवार लघवीला होणे, पांढरी लघवी, लालसर रंग येणे, ओटीपोटीत दुखणे या सगळ्यांमुळे हनिमूनची पूर्ण रंगतच संपून जाते. बऱ्याचदा संबंध आल्यानंतर दोन तीन दिवसांनी असे होते किंवा तापही येतो.

**तपासणी :** युरिन टेस्टमध्ये जंत आढळतात.

**उपचार :** ऑन्ट बायोटिक्स (३ ते ५ दिवस), पेन किलर्स,व ॲन्टि स्पासमोडिक्स वापरतात. तसेच अल्कलायझर्स वापरतात. हे दुखणं २ ते ३ दिवसात कमी होते.

**दक्षता :** अशा वेळी साथीदाराची साथ खूप महत्त्वाची असते आणि याकाळात संबंध न ठेवणे महत्त्वाचे ठरते.

**काळजी :** कोमट पाण्याने अंग धुणे, साबण नसलेल्या पाण्याचा वापर करणे, भरपूर पाणी पिणे, कॅनबेरी ज्यूस, लेमन वॉटर यांचं प्राशन करणं फायद्याचं ठरतं. यामुळे हे दुखणं लवकर आटोक्यात आणणे शक्य होतं.

**टाळण्याचे उपाय :**

* भरपूर पाणी पिणे.
* कॅनबेरी, लेमन ज्यूस प्राशन करणे.
* कॉफी, सोडा, फ्रूट ज्यूस यांचे प्राशन न करणे.
* फास्ट फूड न खाणे.
* संबंध येण्याआधी आणि संबंध आल्यानंतर लगेच बाथरुमला जाणे. जेणेकरुन मूत्रमार्गातील जंतू फ्लश केले जातील.
* कोणत्याही प्रकारचा स्प्रे, मलम किंवा लुब्रिकन्ट्स बाह्यांगाला लावू नयेत.
* संबंधांवेळी इजा होऊ नये म्हणून वॉर बेस्ड लुब्रिकन्टचा वापर करावा.
* हनिमूनहून आल्यानंतरही जर हे इंफेक्शन राहिले तर ताबडतोब युरॉलॉलिस्ट, एन्ड्रोलॉजिस्ट आणि सेक्सॉलॉजिस्टना दाखवावे.
* **फायमोसिस :** पुरुषांनी सहसा हनिमूनला जाण्याआधी कोणत्याही प्रकारची लैंगिक समस्या असेल तर आधी ट्रीटमेंट घ्यावी आणि मगच हनिमूनचा प्लॅन करावा.
* बऱ्याचदा स्कीन टाइट असल्यामुळे ती ब्रेक होते आणि रक्तस्त्राव होतो.
* **प्यारा फायमोसिस :** अशा टाईट स्कीन जर मागे गेली आणि तशीच मागे राहिली तर त्या भागाला भरपूर सूज येते अशा वेळी त्वरित युरॉलॉजिस्ट, एन्ड्रॉलॉजिस्टना दाखवून उपचार करून घ्यावेत. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# NEET परीक्षेत मेहुल तोष्णीवालचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** स्थानिक माहेश्वरी समाजाचे जिल्हा कोषाध्यक्ष गोपाल तोष्णीवाल आणि माजी नगरसेविका शैला तोष्णीवाल यांचा मुलगा मेहुल याने NEET परीक्षेत 628 गुण मिळवून उत्तुंग यश संपादन केले.त्याचे आजोबा जगनाथ तोष्णीवाल यांचे एक स्वप्न होते की मुलगा किंवा नातू डॉक्टर व्हावे मेहुल ने NIT च्या निकालात यश मिळवून डॉक्टर बनून समाजसेवा करणार आहे मेहुल त्याचे यशा चे श्रेय त्याच्या आजी-आजोबांना, त्याचे मामा आशिष ,गोपाल लड्डा तसेच श्वेता सिंगी, केला मॅडम, डॉ.आर.एन. लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक तसेच अध्यक्ष याना देतो ,त्याचा माहेश्वरी समाजा कडून व चिखली अर्बन बँकेने त्यांचे स्वागत केले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in